औद्योगिक न्यायालय, पुणे
पी.एम.टी. इमारत क्र.१, दुसरा मजला,
स्वारगेट, पुणे - ४११०४२ फोन नं.०२०-२४४७०४५२/९७६४३७६८७५
Email Id : icpune@yahoo.co.in

---

जावक क्र.औन्यापु/आस्था/४७८/२०२४ दि.०६/०६/२०२४

# जाहिर लिलाव

या कार्यालयाने निर्लेखित केलेले जुनी मारुती ओमनी वाहन क्रमांक एम. एच. १२- ऐ.एच. ६२९६ सन २००० चे मॉडेल हे सन २०१४ पासून बंद स्थितीत पडून आहे. सदर वाहन आहे त्या स्थितीत जाहिर लिलावाव्दारे विकणे आहे. सदर वाहनाचा जाहिर लिलाव दिनांक १८/०७/२०२४ रोजी खालील कार्यालयाच्या पत्त्यावर करण्यात येणार आहे. सदर वाहन ज्यांना खरेदी करावयाचे आहे त्यांनी लिलावाचे दिवशी सकाळी ठिक ११:०० वाजता उपस्थित रहावे. सदर लिलावात भाग घेण्यासाठी ठरविणेत आलेली अनामत रक्कम रुपये ७,०००/- रोख स्वरुपात लिलाव सुरु होण्यापुर्वी भरावी लागेल.

निर्लेखित केलेल्या वाहनाच्या लिलावाव्दारे विक्रीबाबत नियम, अटी व शर्ती -

१. वाहनाची निर्धारीत विक्री किंमत रुपये १७,०००/- ऐवढी ठरविण्यात आली आहे.

२. वाहन जेथे आहे व जसे आहे तसे या तत्वावर विक्री करणे आहे.

३. उपरोक्त वाहन हे सार्वजनिक बांधकाम विभाग उपविभाग क्र. २ मॅकॅनिकल डिव्हीजन, ससून हॉस्पीटल रोड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन च्या जवळ, पुणे-१ या ठिकाणी असून पाहणीसाठी इच्छुक खरेदीदारांना पाहता येईल.

४. लिलावामध्ये सर्वाधिक रक्कमेची बोली लावणाऱ्या खेरेदीदाराची बोली स्विकारण्यात येईल. सदर खरेदीदारास संपूर्ण रक्कम तात्काळ भरावी लागेल.

५. वाहनाची तपासणी करणेकरीता तसेच वाहनाची अधिक माहिती मिळवणेकरीता कार्यालयाच्या खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

६. कार्यालय केवळ वाहन विक्री हस्तांतरण कागदपत्रावर स्वाक्ष-या करेल. या शिवाय वाहनाच्या विमा, नोंदणी, रोड टॅक्स इत्यादीसाठी येणारा सर्व खर्च खरेदीदारास करावा लागेल.

७. सदर लिलाव प्रक्रिया जाहिरात कोणत्याही वेळी / कोणत्याही कारणास्तव / कोणत्याही टप्प्यावर पुर्णतः किंवा अंशतः रद्द करण्याचा / फेरबदल करण्याचे सर्व अधिकार व अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार मा. प्रशासकीय सदस्य, औद्योगिक न्यायालय, पुणे यांना असतील.

८. लिलावा दिवशी खरेदीदाराने ओळखीचा पुरावा म्हणून पॅन कार्ड, आधार कार्ड, मतदान ओळखपत्र इत्यादी कागदपत्रे कार्यालयात जमा करावेत.

सही/-
प्रशासकीय सदस्य,
औद्योगिक न्यायालय, पुणे

कार्यालयाचा पत्ता

औद्योगिक न्यायालय, पुणे
पी.एम.टी. बिल्डिंग क्र.१, दुसरा मजला,
स्वारगेट, पुणे - ४११०४२
दुरध्वनी क्र. ०२०-२४४७०४५२